ePaper

**महाजन यांनी उगाच आदळ आपट करण्याची काहीच गरज नाही : एकनाथ खडसे?**



| वर्ष - 8 | अंक - 256 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 7 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- गुजरातचा ७ विकेट्सनी विजय!
- सामना सुरू असताना झोपला होता आर्चर
- श्रीमंत होण्याची हीच योग्य वेळ
- ९ टक्के हिंदू एकत्र आले तरीही रामराज्य

### वंदनीय बाळासाहेबांच्या 3 माजी शिलेदारांचा उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघात

# 'जनाब' उद्धव : मुस्लिमांचा मसीहा!

## एकनाथ शिंदे, नारायण राणे आणि निरुपम कडाडले..मुस्लिम मतांसाठी 'उबाठा' विकले गेले !

| मुंबई / कोल्हापूर / मालवण | प्रतिनिधी | महाईन्यूज

**'वक्फ' बोर्डाचे सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाले असले तरी आणि राष्ट्रपतींनी त्यावर स्वाक्षरी केल्याने तो कायदा अस्तित्वात आला असला तरी या विधेयकाच्या विरोधात ठामपणे उभे राहणारे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यावर आणि त्यांच्या गटावर शिवसेनाप्रमुख, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या एकेकाळच्या तीन शिलेदारांनी घणाघाती हल्ला चढवला आहे. मुस्लिम मतांसाठी उद्धव ठाकरे हे 'मुस्लिमांचा मसीहा' झाले असून विधेयकाला विरोध करून त्यांनी मुस्लिमांचे लांगुलचालन तसेच तुष्टीकरण केल्याचा तिघांनी सनसनाटी आरोप केला आहे.**

### चेहरा भोळा भानगडी सोळा..

मूळ शिवसेनेला खिंडार पाडून बाहेर पडलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर उद्धव ठाकरे यांच्यावर अगदी शेलक्या शब्दात टीका केली आहे. चेहरा भोळा आणि भानगडी सोळा, असा टोमणा त्यांनी उद्धव ठाकरेंना मारला आहे. तुम्ही आमच्यावर कितीही टीका केली किंवा कोणतेही शब्द वापरले, तरी आमच्याच पक्षाला खरी शिवसेना आणि धनुष्यबाण हे चिन्ह निवडणूक आयोगाने दिले आहे. तुम्हाला विचारतो कोण? असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### चोहोबाजूंनी टीकेचे धनी..

मुस्लिमांची बाजू घेतल्यामुळे सर्व विरोधी राजकीय पक्षांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्रे सोडली आहेत. अशा 'डबल ढोलकी' भूमिकेमुळे उद्धव ठाकरेंच्या गटाला धड हिंदू जवळ करणार नाहीत आणि धड मुस्लिमही 'आपले' म्हणणार नाहीत, असा बहुतेकांच्या टीकेचा रोख आहे.

### नारायण राणे नेमके काय म्हणाले ?

वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे एकेकाळचे 'उजवे हात' समजले गेलेले माजी नारायण राणे यांनी वक्फ विधेयकाच्या निमित्ताने उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या भूमिकेचा निषेध करत जोरदार शाब्दिक हल्ला चढवला आहे. पुढील निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचा हा गट संपलेला असेल. त्यांना धड काही भूमिका नाही, दूरदृष्टी नाही. केवळ आपल्या चमच्यांच्या जीवावर गट चालला आहे. ही मंडळी उद्धव ठाकरे यांना गाळात घालत आहेत, हे सुद्धा त्यांच्या लक्षात येत नाही. आजच्या चांगल्या दिवशी असल्या माणसाचे नाव कशाला घ्यायचे, असे सांगून नारायण राणे म्हणाले, की विकास, समृद्धी आणि लोकहित हे उद्धव ठाकरेंचे काम नाही. चांगल्या कामाला अडथळे आणणे आणि ऊठसूठ शिव्या घालणे, ही त्यांची संस्कृती बनली आहे.

### एकनाथ शिंदे हेच जनतेच्या मनातला मुख्यमंत्री..

इचलकरंजीचे खासदार धैर्यशील माने यांनी तर जाहीर सभेत स्पष्ट केले, की एकनाथ शिंदे हेच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहेत. खरी शिवसेना आमचीच आहे आणि मतदारांनी कौल देऊन ते सिद्ध केले आहे, असे या जाहीर सभेत एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या चमच्यांना आम्ही विकासकामांतून उत्तर देऊ, जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवल्याचेही शिंदे यांनी आवर्जून सांगितले.



### पुढील निवडणुकीत उद्धव संपेल !

मुस्लिमांच्या दाढ्या कुरवाळणाऱ्या उद्धव ठाकरे यांना माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे भाजपाचे खासदार नारायण राणे यांनी जोरदार टोलवले आहे. आपल्याकडे असलेल्या मोजक्या शब्दांच्या भांडवलावर रोज ऊठसूठ शिव्या घालणे आणि सरकारच्या चांगल्या कामामध्ये सतत व्यत्यय आणणे, हे उद्धव ठाकरेंचे एकमेव काम सुरू आहे. त्यांचा शिल्लक गट पुढील निवडणुकीत राहत नाही. तो आता इतिहास जमा झालेला मृतवत् पक्ष आहे, असेही राणे म्हणाले.



### संजय निरुपम यांचा हल्लाबोल..

शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांनी उद्धव ठाकरे यांना खरी खरी सुनावली आहे. सर्वस्व संपत आल्यामुळे उबाठा सेनेची शिल्लक ताकत वाचवण्याची धडपड सुरू आहे. वक्फ बोर्डाच्या आता किती जमिनी शिल्लक आहेत, याचा सरकारने विचार करायला हवा. मुस्लिमांच्या संघटनांकडून उद्धव ठाकरे यांच्या चेल्यांना चांगला पैसा पुरवला जातो, यावरही सरकारने लक्ष ठेवायला हवे. उद्धव ठाकरे गटाचा आता शेवटचा फडफडाट सुरू आहे, असेही संजय निरूपम म्हणाले.



## मुस्लिम मतांसाठी उद्धव ठाकरेंचा विधेयकाला विरोध

# ‘गोखले संस्थे’त महत्त्वपूर्ण पुनर्रचना!

## प्रभारी कुलगुरू डॉ. शंकर दास यांची माहिती

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेमध्ये पुनर्रचना करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात येत असून, या बदलांचे सकारात्मक परिणाम येत्या काळात दिसतील,’ असा विश्वास गोखले संस्थेचे प्रभारी कुलगुरू डॉ. शंकर दास यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेली गोखले संस्था गेल्या काही दिवसांपासून पुन्हा चर्चेत आली आहे.**



मातृसंस्था भारत सेवक समाजाचे अध्यक्ष दामोदर साहू यांनी कुलपती डॉ. संजीव सन्याल यांना हटवून नव्या कुलपतींची नियुक्ती करण्याचा घेतलेला निर्णय, कुलपतींना नियत कालावधीत हटवता येत नसल्याचे कुलगुरूंनी निदर्शनास आणून देणे, त्यानंतर डॉ. सन्याल यांनी दिलेला रोखठोक प्रतिसाद, संस्थेच्या अध्यक्षांनी डॉ. सन्याल यांना कुलपती म्हणून कायम ठेवण्याचे दिलेले पत्र अशा घडामोडी घडल्या. यावर बरीच चर्चा झाली. या पार्श्वभूमीवर डॉ. दास यांच्याशी संवाद साधून त्यांची भूमिका जाणून घेतली.नॅक मूल्यांकनातील घसरणीच्या आरोपांवर डॉ. दास म्हणाले, ‘मी कुलगुरू म्हणून नोव्हेंबर २०२४मध्ये आलो. नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया त्यापूर्वी झाली होती. २०१८ ते २०२३ या काळातील कामगिरीवर आधारित मूल्यांकनामध्ये घसरण झाली, याचा अर्थ पूर्वी चांगले काम झालेले नाही. मात्र, आता असे होणार नाही. गोखले संस्थेमध्ये पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यात नव्या प्राध्यापकांची नियुक्ती, बहुविद्याशाखीय शिक्षण, अध्यापन-संशोधन गुणवत्ता, विद्यार्थी सुविधा अशा सर्वच घटकांवर काम करण्यात येत आहे. विद्यार्थी-शिक्षक संवाद वाढवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षण (इंटर्नशीप), विद्यार्थ्यांनी त्यांचे संशोधन परदेशात सादर करण्यासाठी शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. वसतिगृहापासून सगळ्याच संदर्भात धोरणे निश्चित करण्यात येत आहेत. त्याशिवाय आर्थिक व्यवस्थापनातही सुधारणा करण्यात येत आहेत.’राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार गोखले संस्था विद्यापीठ म्हणून प्रत्यक्षात येण्यासाठी प्रवेश गुणोत्तर, प्राध्यापक-विद्यार्थी गुणोत्तर, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवणे, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, विद्यार्थी-प्राध्यापकांची परदेशातील विद्यापीठांशी देवाणघेवाण, आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प अशा घटकांवर काम करण्यात येत आहे. गोखले संस्थेच्या पुनर्रचनेतून संस्थेचा पूर्वीचा नावलौकिक पुन्हा प्राप्त करणे, सर्वोत्तम संस्था म्हणून घडवण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी संस्थात्मक विकास आराखडा (आयडीपी) तयार करण्यात आला आहे. या बदलांचा सकारात्मक परिणाम नक्कीच दिसतील. गोखले संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी गुणवंत, उत्तम कौशल्ये असलेले, बुद्धिमान असावेत हाच उद्देश ठेवण्यात आला आहे,’ असेही डॉ. दास यांनी नमूद केले.‘गोखले संस्थेचे कुलपती डॉ. संजीव सन्याल यांना तडकाफडकी हटवण्याची प्रक्रिया चुकीची होती. कुलपतींची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना नियत कालावधीत काढता येत नाही, असा विद्यापीठ अनुदान आयोगाचा (यूजीसी) नियम असल्याचे भारत सेवक समाज संस्थेच्या अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर डॉ. सन्याल यांनी त्यांचा सविस्तर प्रतिसादही दिला. त्यामुळे डॉ. सन्याल यांची नियुक्ती कायम ठेवली जाणे स्वाभाविक आहे.

### सर्वोत्तम संस्था म्हणून घडवण्याचे उद्दिष्ट

प्रवेश गुणोत्तर, प्राध्यापक-विद्यार्थी गुणोत्तर, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवणे, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, विद्यार्थी-प्राध्यापकांची परदेशातील विद्यापीठांशी देवाणघेवाण, आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प अशा घटकांवर काम करण्यात येत आहे. गोखले संस्थेच्या पुनर्रचनेतून संस्थेचा पूर्वीचा नावलौकिक पुन्हा प्राप्त करणे, सर्वोत्तम संस्था म्हणून घडवण्याचे उद्दिष्ट आहे.

# माझ्यासारखा आमदार तुम्हाला परत मिळणार नाही

## मी जेवढे काम केले आहे, तेवढे कोणीही केले नाही : अजित पवार

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘सन १९५२ पासून ज्यांनी बारामतीचे प्रतिनिधित्व केले आहे, तेव्हापासून प्रत्येकाची कारकीर्द पहा. त्यांनी काय काम केले ते पहा. बारामतीमध्ये काम करण्याची संधी मला १९९१ पासून मिळाल्यापासून मी कोणती कामे केली ते पहा. माझ्यासारखा आमदार तुम्हाला मिळणार नाही. मी जेवढे काम केले आहे. तेवढे कोणीही केले नाही,’ असा दावा उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बारामतीत केला.**



पवार रविवारी बारामती दौऱ्यावर होते. ते म्हणाले, ‘माझ्यासारखा आमदार पुन्हा मिळणार नाही, हा माझा दावा आहे. बारामतीकरांनी मला लाखापेक्षा जास्त मतांनी निवडून दिले आहे. त्यामुळे मी थांबणार नाही. अंदाजपत्रकामध्ये कामांची तरतूद कशी करायची आणि निधी कसा आणायचा हे मला माहिती आहे. दरम्यान, बारामतीमधील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाजवळ एका हॉटेलमध्ये तरुणाला झालेल्या बेदम माहराणीचीही गंभीर दखल अजित पवार यांनी घेतली.

‘या मारहाणीचे सीसीटीव्ही फुटेज पुढे आले आहे. मोटारसायकलवरून आलेल्या चार तरुणांनी हॉटेलमधील एकाला बेदम मारहाण केली. फुटबॉल खेळात मारतात, तशी मारहाण तरुणाला केली.या प्रकरणात कुणीही दोषी असला, तरी त्याच्यावर कारवाई करा, अशी सक्त सूचना मी पोलीस प्रशासनाला केली आहे. अजित पवारांच्या जवळचा कार्यकर्ता असला तरी किंवा त्याचा मुलगा असला तरी त्याचा बंदोबस्त करा, असे पोलिसांना सांगितले आहे. बारामतीमध्ये असले प्रकार यापुढे खपवून घेतले जाणार नाहीत,’ असे पवार यांनी स्पष्ट केलेत्यांनी काय काम केले ते पहा. बारामतीमध्ये काम करण्याची संधी मला १९९१ पासून मिळाल्यापासून मी कोणती कामे केली ते पहा. माझ्यासारखा आमदार तुम्हाला मिळणार नाही. मी जेवढे काम केले आहे. तेवढे कोणीही केले नाही,’ असा दावा उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बारामतीत केला.

### मी थांबणार नाही : अजित पवार

अंदाजपत्रकामध्ये कामांची तरतूद कशी करायची आणि निधी कसा आणायचा हे मला माहिती आहे.दरम्यान, बारामतीमधील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाजवळ एका हॉटेलमध्ये तरुणाला झालेल्या बेदम माहराणीचीही गंभीर दखल अजित पवार यांनी घेतली.‘या मारहाणीचे सीसीटीव्ही फुटेज पुढे आले आहे.

## अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

# महापालिका अधिकारी होणार अधिक स्मार्ट!

## कामकाजात एआय तंत्रज्ञानाचा वापर

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रशासनातील प्रभावी वापर याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत माहिती देण्यात आली. आपल्या नेहमीच्या कामकाजात एआय तंत्रज्ञानाचा वापर करून महापालिकेचे अधिकारी अधिक स्मार्ट होणार आहेत.**



महापालिकेत झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उपायुक्त विठ्ठल जोशी, मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, सचिन पवार, डॉ. प्रदीप ठेंगल, नीलेश भदाने, सीताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, मनोज सेठिया, क्षेत्रीय अधिकारी, विभागप्रमुख उपस्थित होते. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक समीर पांडे व विनायक कदम यांनी मार्गदर्शन केले.

### ई-गव्हर्नन्स टूल्सचे प्रशिक्षण

अधिकाऱ्यांना चॅट जीपीआय, भाशिनी, डिजी लॉकर, एपीआय आणि इतर ई-गव्हर्नन्स टूल्सचे प्रशिक्षण देण्यात आले. महापालिकेच्या आगामी योजनांमध्ये यापैकी अनेक साधनांचा समावेश करून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा पुरवण्यात येणार आहेत.

दैनंदिन प्रशासकीय कामकाजात एआयद्वारे कार्यक्षमता वाढवणे. मानवी चुका कमी करणे, नागरिकांच्या अपेक्षांनुसार सेवा पुरवणे. डेटावर आधारित निर्णय प्रक्रिया राबविणे. शासकीय पत्रव्यवहार, अहवाल लेखन, योजना प्रस्तावना, नागरिक तक्रार निवारण इत्यादींसाठी एआयचा वापर केला जाणार आहे. डिजिटल गव्हर्नन्स, डिजिटल लीडरशिप आणि स्मार्ट सिटीमध्ये एआयची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. एआय वापराचे धोके आणि जबाबदाऱ्या, गुप्तता, नैतिकता, चुकीची माहिती आणि नियमन आदीबाबत माहिती देण्यात आली.

### गतिमान सेवा मिळणार

प्रशासन अधिक गतिमान, कार्यक्षम व नागरिक केंद्रित बनविण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर करावा. डिजिटल प्रशासन व पारदर्शकता, वाहतूक व्यवस्थापन सुधारणा, स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छता सुधारणा, पिण्याचे पाणी व स्वच्छता सुधारणा, स्मार्ट शहर सुरक्षा व सार्वजनिक जागा सुधारणे, तंत्रज्ञानाधारित सुधारणा व महसूल वाढ या सर्व कामांत सुधारणा करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर महापालिका करणार आहे, असे महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

### दैनंदिन कामे सुलभ

'एआय'चा वापर केल्यामुळे अधिकारी व कर्मचारी दैनंदिन कामकाजातील नोंदी व्यवस्थापन, पत्रव्यवहार, अहवाल लेखन, नागरिकांच्या तक्रारींचे विश्लेषण जलद, अचूक आणि परिणामकारक पद्धतीने करू शकतील. चॅट जीपीटीसारखी साधने शासकीय मजकूर तयार करण्यात वेळ व कष्ट वाचवतात. डेटा विश्लेषण टूल्स धोरणनिर्मितीत मदत करतात. हे तंत्रज्ञान भविष्य नाही, तर आजच्या कामाचा एक भाग बनू लागले आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांना अशा प्रकारचे प्रशिक्षण वेळोवेळी देण्यात येणार आहे, असे माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांनी सांगितले.

---

## पीएमआरडीए हद्दीत अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले

## सरपंचांच्या अध्यक्षतेखालील समिती कागदावरच

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पीएमआरडीए क्षेत्रातील विविध ठिकाणी अनधिकृत बांधकामांची संख्या वाढत चालली आहे. या बांधकामांना अटकाव घालण्यासाठी ग्रामस्तरीय समितीने लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र ग्रामस्तरावरील अयोग्य नियोजन आणि या सर्वांवर नियंत्रणासाठी असणाऱ्या पीएमआरडीएकडे कमी असणाऱ्या मनुष्यबळामुळे अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहे. त्यामुळे ग्रामस्तरीय समिती ही केवळ कागदावरच राहिली असल्याचे दिसून येते.**




प्राधिकरणाकडून अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी लोकसहभागातून प्रयत्न करण्यात येत आहेत; मात्र या प्रकरणांमध्ये प्रत्यक्षामध्ये कोणी लक्ष घालत नसल्याने अनधिकृत बांधकामाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) भौगोलिक क्षेत्र मोठे आहे; मात्र त्यामानाने ~~अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे या~~ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास मर्यादा येत होत्या. त्यामुळे प्राधिकरणाच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी व अधिकृत बांधकामांचा चालना देण्यासाठी त्या गावातील स्थानिक शासकीय कर्मचारी व लोकसेवक यांची मदत घेतली जाते. त्यामुळे अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवणे, नोटिसा देणे, कारवाईच्या वेळी प्राधिकरणाला मदत करणे आदी कामे या समितीच्या मदतीने होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येते.


प्राधिकरणाचे सुमारे ६ हजार २४६ चौरस किलोमीटर इतके क्षेत्र आहे. मावळ, मुळशी, हवेली, पुरंदर, खेड, शिरूर, दौंड, भोर, वेल्हा या नऊ तालुक्यांतील सुमारे ६९७ गावांचा त्यामध्ये समावेश होतो. तर प्राधिकरणाकडे अनधिकृत बांधकामे निर्मूलनासाठी ४८ पदे मंजूर आहेत. त्यामध्ये १५ पदे रिक्त आहेत.

अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागामध्ये अधिकारी, कर्मचारी अपुरे असल्याने लोकसेवक व शासकीय अधिकारी अशी पाच जणांची समिती नेमण्यात येणार आहे. प्रत्यक्षामध्ये मंजुरी, बांधकाम परवाना यासाठी अर्थपूर्ण संबंध जोपासावे लागतात. यापूर्वी बांधकाम विभागातील तक्रारीमुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना कमी केले होते. त्यानंतर आता शासकीय समिती नेमल्यानंतर अंमलबजावणी होणार की वाटा वाढणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, संबंधित गावातील अनधिकृत बांधकाम आढळून आल्यास या सर्वांची चौकशी देखील होणार आहे.

### अनधिकृत बांधकाम विभाग करते काय?

अपुऱ्या मनुष्यबळामुळे अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास अपेक्षित गती मिळत नसल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षामध्ये प्राधिकरणाने केलेल्या सर्वेक्षणात सुमारे नऊ ते दहा हजारांपेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे असल्याचे आढळून आले आहे. यातील बहुतेक सर्वांना प्राधिकरणाकडून नोटिसा बजावल्या आहेत. प्रामुख्याने शहरालगतच्या गावांमध्ये अलीकडच्या काळात प्रमाणबाह्य अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. गेल्या सहा महिन्यांमध्ये रस्ता रुंदीकरण, होर्डिंग, बांधकाम, अतिक्रमणे अशा जवळपास सव्वाचार हजार अनधिकृत बांधकामावर कारवाई केल्याची माहिती पीएमआरडीए प्रशासनाने दिली. मात्र त्यापूर्वी अगदी किरकोळ म्हणजेच वर्षाकाठी ६० ते ७० अनधिकृत बांधकामांवर कारवाई झाली आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत हे चालते-बोलते देवच आहेत

व्यवहारात ज्याला चांगले वागता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. व्यवहारात झालेल्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देणार नाही असा निश्चय करावा, आणि सद्गुरूआज्ञा प्रमाण मानून तो तडीस न्यावा. साधनावर जोर द्यावा. स्वत: कोण याची ओळख करून घ्यावी. भगवंतापरते कोणी नाही हे कळले म्हणजे मी कोण हे कळते. निर्गुण जरी समजले तरी सगुण नाही सोडू. माझ्या मुखी राम आला यापरते दुसरे भाग्य ते कोणते ? हृदयात स्फूर्ती येऊनच आपण बोलतो; मग आमच्या मुखात राम आला तर तो हृदयात नाही असे कसे म्हणावे ?

तुम्ही मला उपनिषदांतले सांगा म्हटले तर कसे सांगू ? ज्याने जे केले तेच तो सांगणार. एक - गुरुआज्ञापालन याशिवाय दुसरे काहीच मी केले नाही, तर मी दुसरे काय सांगणार ? संताचा समागम केला म्हणजे आपण मार्गाला लागतो. आपण साधूला व्यवहारात आणतो, आणि नंतर तो आपल्याशी व्यवहाराने वागला म्हणजे त्याच्याजवळ समता नाही म्हणून उलट ओरड करतो! संत हे देहाचे रोग बरे करीत नसून, त्या रोगांची भीती नाहीशी करतात. संत हे चालते-बोलते देवच आहेत. संतांच्या देहाच्या हालचालींना महत्त्व नाही. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे कार्य होय. संतांचा कोणताही मार्ग हा वेदांच्या आणि शास्त्राच्या उलट असणे शक्यच नाही. संत सूर्यासारखे जगावर स्वाभाविक उपकार करतात. सूर्याचे तेज कमी होते आहे असे शास्त्रज्ञ म्हणतात, पण संतांचे तेज मात्र वाढतेच आहे.

श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेला मुलगा भीक मागताना पाहून आपल्याला त्याची कीव येते, त्याप्रमाणे मनुष्यजन्माला येऊन आपण दु:ख करतो हे पाहून संतांना वाईट वाटते. एकूण योनी इतक्या आहेत की, त्यांमध्ये मनुष्यजन्म येणे कठीण आहे. मनुष्यजन्म येऊन भगवंताची प्राप्ती झाली नाही तर जीवाचे फार नुकसान आहे. म्हणून अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, त्यांची कृपा प्राप्त करून घ्यावी. संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भीतीच नाही. आपण प्रपंचात इतके खोल जातो, की संतांची हाक ऐकू येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे. संतवचनावर विश्वास ठेवूया, म्हणजे भगवत्प्रेम लागेलच. ते लागल्यावर विषयप्रेम कमी होईल. म्हणून संतांची संगत करणे एवढे जरी केले तरी कल्याणच होईल.

**बोधवचन:- संत-संगती आणि नामस्मरण यानेच भगवत्प्रेम येईल.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# अमेरिकेचे 'ट्रम्प कार्ड', मोदीजींचा विषय हार्ड !

**आपल्याला माहीत आहे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच 'रेसिप्रोकल टेरीफ अरेंजमेंट' ची घोषणा केली. साधारणतः एक महिन्यापूर्वीच त्यांनी याबाबत मेक्सिको, चीन, कॅनडा आणि भारत या देशांना अल्टिमेटम दिलेला होता. या देशांकडून अमेरिकन वस्तूंवर जितका आयात कर आकारला जातो, तशाच पद्धतीचे 'टेरीफ' अमेरिका या देशांमधून येणाऱ्या वस्तूंवर आकारेल, असे त्यांनी जाहीर केले होते. त्यानुसार 'लिबरेशन डे'च्या माध्यमातून ट्रम्प यांनी आपले 'टेरीफ अस्त्र' अखेर चालवले आहे. हे अचानक घडलेले नाही, तर त्यांनी आधीच सांगितले होते हा मुख्य मुद्दा !**

### सुमारे १३० अब्ज डॉलर्सचा व्यापार

भारताच्या दृष्टीने विचार केल्यास, भारत-अमेरिका यांच्यातील सध्याचा व्यापार हा सुमारे १३० अब्ज डॉलर्स इतका आहे. या व्यापारामध्ये प्रामुख्याने भारताच्या बाजूने 'व्यापारबूट' आहे. प्रतिवर्षी ८८ अब्ज डॉलर्सच्या वस्तू भारताकडून निर्यात केल्या जातात, तर ४० अब्ज डॉलर्सच्या वस्तू भारत अमेरिकेकडून आयात करतो. भारताकडून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीमध्ये जेम्स अँड ज्वेलरी पहिल्या स्थानावर आहे. साधारणतः १६ अब्ज डॉलर्सची जेम्स अँड ज्वेलरी भारत दरवर्षी अमेरिकेत्या निर्यात करतो. नव्या टेरीफ धोरणानुसार अमेरिकेने यावर २६ टक्के आयात शुल्क लागू केले आहे. यामुळे भारतातील या उद्योगाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे, हे लक्षात घ्यायला हवे!

### मोटारींचे सुटे भाग, कोळंबी मासे

भारताकडून अमेरिकेला ऑटोमोबाईलचे सुटे भागही मोठ्या प्रमाणावर निर्यात होतात. टाटा मोटर्ससारख्या कंपन्या अमेरिकेला मोठ्या प्रमाणात सुट्या भागांची निर्यात करतात. जॅग्वार ही कंपनी टाटा मोटर्सने टेकओव्हर केलेली आहे. यावर नव्या टेरीफ धोरणांचा मोठा परिणाम होऊ शकतो. याखेरीज केमिकल्स आणि कृषि उत्पादनांवरही ट्रम्प यांनी आयात शुल्क वाढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. भारतातून कोळंबीसारख्या माशांची निर्यात अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर होते. पण २६



टक्के आयात कर आकारणीमुळे ही सर्व निर्यात बाधित होणार आहे.

### भारताला सात अब्ज डॉलर्सचे नुकसान?

एकत्रितपणाने विचार केल्यास, भारताला दरवर्षी ७ अब्ज डॉलर्सचे नुकसान ट्रम्प यांच्या नव्या टेरीफ धोरणामुळे होऊ शकते, असा अंदाज आहे. भारताने यासंदर्भातील मानसिकता ठेवलेली होती आणि त्यानुसार काही अमेरिकन उत्पादनांवरील आयात शुल्कात कपात करण्याचा निर्णयही घेतला होता. उदाहरणार्थ, हार्ले डेव्हिडसन या मोटारसायकलवरील आयात शुल्क कमी करण्यात आले. तसेच अमेरिकेतून आयात होणाऱ्या व्हिस्कीवरील आयात शुल्कात कपात करण्यात आली. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची भेट घेतली होती. त्यावेळी साधारणतः २२ वस्तूंवरील आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

### लवकरच व्यापार कराराची शक्यता

याखेरीज अमेरिकन व्यापारमंत्र्यांसोबत भारताच्या चर्चा सुरू असून लवकरच दोन्ही देशांमध्ये एक व्यापार करार होण्याची शक्यता आहे. यामध्ये अमेरिकेकडून आयात केली जाणारी दुधाची भुकटी, अमेरिकन सफरचंद, बदाम यांवरील आयात शुल्क भारताला कमी करावे लागणार आहे. दुधाच्या भुकटीवर भारतात सुमारे २२ टक्के आयात शुल्क आकारले जाते. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे अमेरिकन कारवरील इम्पोर्ट ड्युटीही कमी करावी लागणार आहे. उदाहरणार्थ, टेस्लासारखी कार भारतात आयात करायची झाल्यास त्यावर मोठ्या प्रमाणावर आयात शुल्क आकारले जाते. तसे पाहिले तर, अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर भारताकडून आकारले जाणारे आयात शुल्क भरभक्कम असण्यामागे दोन प्रमुख कारणे आहेत.

### यात समाविष्ट लक्झुरीअस वस्तू !

एक म्हणजे यातील बहुतांश वस्तू या लक्झुरीयस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आहेत. उदाहरणच घ्यायचे झाल्यास, हार्ले डेव्हिडसनवरील आयात शुल्क १०० टक्क्यांनी जरी कमी केले तरी ही दुचाकी ७ ते ८ लाखांना मिळू शकते. याउलट भारतीय रॉयल एन फिल्ड किंवा बुलेट ही तीन ते चार लाखांना उपलब्ध होते. त्यामुळे सर्वसामान्य भारतीय हार्ले डेव्हिडसन घेण्याचा विचारही करू शकत नाही. ही दुचाकी अतिश्रीमंत वर्गाकडूनच खरेदी केली जाते. अशाच प्रकारे टेस्लाची इलेक्ट्रिक कार ३० ते ४० लाखांना भारतात उपलब्ध होऊ शकते. अर्थात् च ही काराही सामान्य माणूस खरेदी करू शकत नाही. तिचा ग्राहक हा अतिश्रीमंत वर्गच असणार आहे. त्यामुळे या वस्तूंवर लक्झरी टॅक्स लावण्यात आला असून आपल्या दृष्टीने तो योग्यच आहे.

### करांमुळे उद्योगांना संरक्षण !

यामागचे दुसरे कारण म्हणजे आपल्याकडील उद्योगांना या करांमुळे संरक्षण मिळते. अन्यथा अमेरिकन उत्पादने कमी दरात भारतीय बाजारात उपलब्ध होऊ लागल्यास आपल्या स्थानिक उद्योगांना त्याचा फटका बसण्याचा धोका उद्भवतो. तो टाळण्यासाठी भारत इतक्या मोठ्या प्रमाणावर आयात शुल्क आकारतो. पण, भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यात वस्तूंवर तेथे इतका कर आकारला जात नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी नेमका यावरच आक्षेप घेतला आहे.

### 'जीडीपी'च्या दृष्टीने व्यापार तीन टक्के !

वास्तविक पाहता, भारताच्या 'जीडीपी' च्या दृष्टीने विचार करता अमेरिकेबरोबरचा व्यापार केवळ तीन टक्के इतका आहे. त्यामुळे सुरुवातीला ट्रम्प यांच्या टेरीफ अस्त्राचे परिणाम जाणवू शकतात. पण, भारतासाठी युरोपची बाजारपेठ खूप मोठी आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी केवळ भारतावरच नव्हे तर जपान आणि दक्षिण कोरिया या अमेरिकेच्या मित्र देशांवरही असाच भरभक्कम कर लागू केला आहे. दुसरीकडे चीनवर ५४ टक्के, व्हिएतनामवर ४६ टक्के, बांगलादेशवर ३७ टक्के, आणि थायलंडवर ३६ टक्के असे कठोर आयात शुल्क लावण्यात आले आहे. एकूण ६० देशांवर ट्रम्प यांनी आपले 'टेरीफ अस्त्र' चालवल्यामुळे संपूर्ण जागतिक अर्थकारणावर याचे कोण कोणते प्रतिकूल परिणाम येणाऱ्या काळात होणार आहेत, हे पाहणे उचित ठरणार आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहणार नाही!

## रावसाहेब दानवे यांची काँग्रेस, ठाकरे गटावर जोरदार टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यातील विविध मुद्यांवरून विरोधक महायुती सरकारवर टीका करत आहेत, तर त्या टीकेला सत्ताधारी पक्षाचे नेते जोरदार प्रत्युत्तर देत आहेत. यातच आज भारतीय जनता पक्षाचा वर्धापन दिन असल्याने राज्यातील विविध ठिकाणी कार्यक्रम पार पडले आहेत. जालना जिल्ह्यात देखील या पार्श्वभूमीवर मजबूत संघटन ऑनलाईन कार्यकर्ता संमेलन पार पडलं.**



या संमेलनाच्या माध्यमातून भाजपाचे नेते तथा माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. मात्र, याचवेळी रावसाहेब दानवे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि ठाकरे गटावर जोरदार टीका केली. यावेळी रावसाहेब दानवे यांनी एक मोठा दावा केला आहे. 'उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहणार नाही', असं विधान रावसाहेब दानवे यांनी केलं आहे.या संमेलनाच्या माध्यमातून भाजपाचे नेते तथा माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. मात्र, याचवेळी रावसाहेब दानवे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि ठाकरे गटावर जोरदार टीका केली. यावेळी रावसाहेब दानवे यांनी एक मोठा दावा केला आहे. 'उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहणार नाही', असं विधान रावसाहेब दानवे यांनी केलं आहे.भाजपा नेते नारायण राणे यांनीही आज माध्यमांशी संवाद साधत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. नारायण राणे म्हणाले की, "तुम्ही चांगल्या दिवशी नको त्या माणसाचं नाव घेता. विकास, समृद्धी, लोकहित हे उद्धव ठाकरेंचं काम नाही. शिव्या घालणं आणि चांगल्या कामात व्यत्यय आणणं हे उद्धव ठाकरे यांच काम आहे", अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. राणे पुढे म्हणाले की, "त्यामुळे त्यांचा (उद्धव ठाकरे) पक्ष आवळत चालला आहे. पुढच्या निवडणुकीपर्यंत हा पक्ष राहत नाही. मी ३९ वर्ष त्यांच्याबरोबर काम केलं आहे. माननीय बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा पक्ष होता. गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेलं वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक नुकतंच लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झालं आहे. या विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण पाहायला मिळालं. तसेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाने वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाच्या विरोधात मतदान केल्याच्या मुद्यावरून भारतीय जनता पक्षाचे नेते तथा खासदार नारायण राणे यांनी जोरदार टीका केली आहे. तसेच शिव्या घालणं आणि चांगल्या कामात व्यत्यय आणणं हेच उद्धव ठाकरेंचं काम आहे, त्यांचा पक्ष पुढच्या निवडणुकीत राहत नाही, असं म्हणत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघात केला आहे.उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरोधात मतदान केलं आहे. यावर तुम्हाला काय वाटतं? असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी भाजपाचे नेते तथा खासदार नारायण राणे यांना विचारला. यावर बोलताना नारायण राणे म्हणाले की, "तुम्ही चांगल्या दिवशी नको त्या माणसाचं नाव घेता. विकास, समृद्धी, लोकहित हे उद्धव ठाकरेंचं काम नाही. शिव्या घालणं आणि चांगल्या कामात व्यत्यय आणणं हे उद्धव ठाकरे यांच काम आहे", अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. नारायण राणे पुढे म्हणाले की, "त्यामुळे त्यांचा (उद्धव ठाकरे) पक्ष आवळत चालला आहे.

### राणे यांचीही उद्धव ठाकरेंवर टीका

शिव्या घालणं आणि चांगल्या कामात व्यत्यय आणणं हे उद्धव ठाकरे यांच काम आहे", अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. राणे पुढे म्हणाले की, "त्यामुळे त्यांचा (उद्धव ठाकरे) पक्ष आवळत चालला आहे. पुढच्या निवडणुकीपर्यंत हा पक्ष राहत नाही. मी ३९ वर्ष त्यांच्याबरोबर काम केलं आहे. माननीय बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा पक्ष होता. पण बाळासाहेब ठाकरे गेले आणि शिवसेना संपली", अशी टीका नारायण राणे यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यातील विविध मुद्यांवरून विरोधक महायुती सरकारवर टीका करत आहेत.

---

# तर तुम्हाला लोक जोड्याने मारतील!

## मंत्री गिरीश महाजन यांचे राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसेंना उत्तर

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यातला उभा दावा पुन्हा समोर आला आहे. एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांच्यावर खडसेंनी गंभीर आरोप केले आहेत. दरम्यान गिरीश महाजन उत्तर देत म्हणाले मी जर तोंड उघडलं तर तुम्हाला लोक जोड्याने मारतील.**



भाजपाचे 'संकटमोचक' अशी ओळख असलेले मंत्री गिरीश महाजन यांचे एका महिला आयएस अधिकाऱ्यासोबत संबंध असल्याचा खळबळजनक दावा एकनाथ खडसेंनी केला आहे. तसंच आपल्याला त्या महिला अधिकाऱ्याचे नाव देखील माहिती असल्याचं खडसेंनी म्हटलं आहे. एकनाथ खडसे यांनी त्यांचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यासोबतच यासंदर्भात गृहमंत्री अमित शाह यांना भेटून यासंदर्भात विचारणा करणार असल्याचं एकनाथ खडसे यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर गिरीश महाजन आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यात कोणत्या गोष्टींवर चर्चा झाली त्याची माहिती देखील त्यांनी या त्यांच्या व्हिडिओमध्ये सांगितलं आहे.गगनभेदीचे पत्रकार अनिल थत्ते यांनी क्लिप प्रकाशित केली आहे. त्यामध्ये म्हटलंय की, गिरीश महाजन यांच्या 'रंगल्या रात्री अशा' गिरीश महाजन यांचे एका आयएस महिला अधिकाऱ्यासोबत संबंध आहेत. त्या महिलेचे नाव देखील मला माहिती आहे. मात्र ते नाव सांगणं योग्य ठरणार नाही. पण ज्यावेळेस मंत्रिमंडळाचा विस्तारासाठी अमित शाहांकडे बैठक झाली. त्यावेळी अमित शहांनी मंत्री गिरीश महाजन यांना बोलावून घेतले होते.अमित शाह यांनी गिरीश महाजन यांना सांगितले की, तुझे एका महिला आयएस अधिकाऱ्यांसोबत संबंध आहेत, परंतु महाजन यांनी त्यांना सांगितले की, नाही माझे कामानिमित्त बऱ्याच अधिकाऱ्यांसोबत बोलणं सुरू असते.

तुझे संपूर्ण कॉल रेकॉर्ड आमच्याकडे आहेत. रात्री दीड वाजेनंतर तुझे शंभर-शंभर कॉल त्या महिला अधिकाऱ्यांसह झालेले आहेत. तुझे एवढ्या रात्री बोलायचे काय संबंध, सीडीआर खरं बोलतो असे काही प्रश्न अनिल थत्तेंनी शाहांच्या वक्तव्याचा हवाला देऊन उपस्थित केले आहे", असल्याचं एकनाथ खडसे यांनी म्हटलं आहे. ज्यानंतर गिरीश महाजन यांची संतप्त प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी हे सगळे आरोप फेटाळत थेट एकनाथ खडसेंनाच आव्हान दिलं आहे.मी जर एक गोष्ट सांगितली तर एकनाथ खडसे घराबाहेर पडल्यावर लोक त्यांना जोड्याने मारतील.

### खोटं बोलताना माझा अंत बघू नका

मी कधीही कुणालाही तोंड दाखवणार नाही. तसंच जे काही आहे ते लोकांना दाखव फालतू बडबड करु नको अशा पद्धतीने त्यांनी एकनाथ खडसेंचा एकेरी उल्लेखही केला. मी यांना दिलं, मोबाइलमधे होते, मोबाइल हरवला लाज वाटते का खोटं बोलताना. माझा अंत बघू नका.

# श्रीमंत होण्याची हीच योग्य वेळ!

## शेअर बाजाराच्या घसरणीनंतर ट्रम्प यांची पोस्ट चर्चेत!

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**श्रीमंत होण्याची हीच योग्य वेळ”, व्यापार कर लादल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांची पोस्ट चर्चेत!अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर व्यापारी कर लादल्याने अनेक कंपन्यांच्या उत्पादनांवर आणि त्यांच्या किमतीवर परिणाम झाला आहे. परिणामी अमेरिका, भारतासह अनेक देशातील शेअर बाजारात गेल्या आठवड्याभरापासून घसरण पाहायला मिळतेय.**



२०२० च्या लॉकडाऊन काळात अमेरिकेच्या शेअर बाजाराने जी घसरण पाहिली होती त्यासारखी घसरण शुक्रवारीही अमेरिकेत झाली. त्यामुळे अमेरिकेचा शेअर बाजार घसरणीकडे वाटचाल करत असताना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी ट्रूथ या सोशल मीडियावर गुंतवणूकदारांना आकर्षित करणारी पोस्ट केली आहे. मी माझी धोरणे कधीही बदलणार नाही, असं म्हणत श्रींत होण्याची हीच उत्तम वेळ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ट्रुथ या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले,“अमेरिकेत येणाऱ्या आणि मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवणाऱ्या अनेक गुंतवणूकदारांनो, मी माझ्या धोरणांमध्ये कधीही बदल करणार नाही. श्रीमंत होण्याची, पूर्वीपेक्षा जास्त श्रीमंत होण्याची ही उत्तम वेळ आहे!”गुरुवारी तिन्ही प्रमुख अमेरिकन निर्देशांकांनी २०२० नंतरचा सर्वात वाईट दिवस पाहिल्यानंतर, जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या खाईत ढकलण्याची भीती निर्माण झालेली असताना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी ही पोस्ट केली आहे. शुक्रवारी, डाऊ जोन्स इंडस्ट्रियल एव्हरेज फ्युचर्समध्ये १,२०० अंकांची म्हणजेच ३ टक्क्यांची घसरण झाली. गुरुवारी १,६७९ अंकांची घसरण झाली होती. तसंच, आदल्या दिवशी निर्देशांक ४.८४ टक्क्यांनी घसरल्यानंतर एस अँड पी ५०० फ्युचर्समध्येही ३ टक्क्यांनी घसरण झाली, तर नॅस्डॅक १०० फ्युचर्समध्ये २.६ टक्क्यांनी घसरण झाली. कारण चीनमध्ये लक्षणीय एक्सपोजर असलेल्या अनेक टेक कंपन्या दबावाखाली आल्या.दरम्यान अमेरिकेने चीनवर व्यापार कर लादल्यानंतर चीननेही आक्रमक भूमिका घेत अमेरिकेवर आयात शुल्क लावले. त्यानुसार, चीनने आता अमेरिकेच्या सर्व उत्पादनांवर ३४ टक्के कर लादणार आहे. मेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हे वर्षभरापूर्वी अनेक कायदेशीर खटल्यांचा सामना करावा लागला. यादरम्यान ट्रम्प यांनी फोर्ब्सच्या २०२५ च्या अब्जाधिशांच्या यादीत ५.१ अब्ज डॉलर्स संपत्तीसह ७००वा क्रमांक मिळवला आहे. अवघ्या १२ महिन्यांपूर्वी ट्रम्प यांचे आर्थिक भविष्य अंधारात दिसत होते, कायदेशीर अडचणी आणि ४५४ दशलक्ष डॉलर्सच्या फसवणुकीचा निर्णयाच्या ओझ्याखाली ट्रम्प बुडाल्याचे दिसून येत होते. मात्र फोर्ब्सच्या मते, गेल्या १२ महिन्यांच्या कालावधीत ट्रम्प यांची संपत्ती जवळपास दुप्पट झाली आहे. ०२४ मध्ये न्यूयॉर्क कोर्टाने अनुकूल ‘क्रेडिट टर्म्स’ मिळवण्यासाठी त्यांची संपत्ती वाढवून दाखवल्या प्रकरणी निकाल दिल्यानंतर ट्रम्प यांच्या आर्थिक अडचणींना सुरूवात झाली होती. न्यूयॉर्क अटर्नी जनरल लेटिशीया जेम्स यांनी त्यांची मालमत्ता जप्त करण्याचे संकेतही दिले होते, ज्यामध्ये त्यांच्या प्रसिद्ध ४० वॉल स्ट्रीट इमारतीचा देखील समावेश होता. एका वेळी ट्रम्प यांचे अंदाजे कॅश बॅलन्स अवघे ४१३ दशलक्ष डॉलर्स इतके होते.

### डोनाल्ड ट्रम्प यांची संपत्ती दुप्पट

त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांचा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रूथ सोशलची मूळ कंपनी ‘पब्लिक’ केली. जेमतेम उत्पन्न आणि मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून देखील ट्रम्प यांच्या कट्टर समर्थकांनी या कंपनींच्या शेअर्सवर उड्या घेतल्या, ज्यामुळे कंपनीचे शेअर्स एका वेगळ्याच उंचीवर जाऊन पोहचले.ऑक्टोबर २०२४ मध्ये ट्रम्प यांनी नवशिक्या गुंतवणूकदारांसाठी वर्ल्ड लिबर्टी फायनान्शियल हा एक क्रिप्टो प्रोजेक्ट लाँच केल. सुरुवातीच्या काळात अनिश्चितता होती पण ट्रम्प यांनी अध्यक्षीय निवडणूक जिंकल्याने आणि क्रिप्टो उद्योजक जस्टिन सन यांनी केलेल्या प्रचारामुळे या क्रिप्टो प्रोजेक्टचं मूल्य प्रचंड वाढलं. यामुळे ट्रम्प यांच्या संपत्तीत २४५ दशलक्ष डॉलर्सची भर पडली.

---

# ९ टक्के हिंदू एकत्र आले तरीही रामराज्य!

## पश्चिम बंगाल सरकारवर अभिनेते मिथुन चक्रवर्तींची टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते आणि भाजपा नेते मिथुन चक्रवर्ती यांनी पश्चिम बंगालच्या हिंदू मतदारांसाठी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. राज्यात ९ टक्के हिंदू एकत्र आले तरीही रामराज्य स्थापन होईल हे कुणी विसरु नये.**




मिथुन चक्रवर्तींनी मागच्या महिन्यात पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा या ठिकाणीही असंच एक वक्तव्य केलं होतं. पश्चिम बंगालच्या राज्यातील लोकांना माझं इतकंच सांगणं आहे की बंगालमध्ये ९ टक्के हिंदू असे आहेत जे मतदान करत नाहीत. त्यांनी एकत्र आलं पाहिजे आणि मतदान केलं पाहिजे. त्यांनी बाहेर यावं आणि मतदान करावं. आपण जिंकलो नाही तर हिंदू अडचणीत येतील असं मिथुन चक्रवर्ती यांनी म्हटलं होतं.

आज तकने हे वृत्त दिलं आहे. उत्तर २४ परगणा या ठिकाणी मिथुन चक्रवर्ती असंही म्हटलं होतं. बांगलादेशात जे घडलं आहे त्यावरुन आपण धडा घेतला पाहिजे. आपण जर जिंकलो नाही तर पश्चिम बंगालमध्ये हिंदू बंगाली वाचणार नाहीत. भाजपा समर्थक हिंदू बंगाली सुरक्षित राहणार नाहीत. जर पुन्हा आहे तेच लोक सत्तेत आले तर ते आपल्याला सोडणार नाहीत असंही मिथुन चक्रवर्ती यांनी म्हटलं आहे. उत्तर २४ परगणामध्ये मिथुन चक्रवर्ती म्हणाले होते की आपण जिंकलं पाहिजे, त्याचं कारण बांगलादेशातील परिस्थिती. व्यक्तिगत विचारधारा, पसंती-नापसंती सगळं काही बाजूला ठेवा आणि भाजपाच्या उमेदवाराला निवडून द्या. आधी हे लक्षात घ्या की आपल्याला निवडणूक जिंकायची आहे. बाकी सगळ्या गोष्टी बाजूला ठेवा. हेच धोरण आपल्याकडे फायदेशीर ठरणार आहे असंही मिथुन यांनी म्हटलं आहे.भाजपा नेते आणि अभिनेते मिथुन हे ममता सरकारवर सातत्याने टीका करताना दिसत आहेत. सर्वोच्च न्यायलायने पश्चिम बंगाल स्कूल सेवा आयोगात भरती घोटाळ्यानंतर २५ हजारांहून अधिक नियुक्त्या रद्द करण्याचा कोलकाता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. ज्यानंतरही मिथुन यांनी तिखट शब्दांत प्रतिक्रिया दिली. या सगळ्यामुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होतं आहे आणि त्यासाठी पूर्णपणे टीएमसी सरकार अर्थात ममता बॅनर्जींचं सरकार कारणीभूत आहे असं मिथुन यांनी म्हटलं आहे. मी तरुणांना आणि युवकांना हे सांगू इच्छितो की तुम्हाला तुमच्या भविष्याची चिंता असेल तर आत्ता असलेलं हे सरकार हटवा आणि भाजपाला निवडा. भाजपाच तुमचं भविष्य उज्वल करु शकते असंही मिथुन म्हणाले.

### भाजपाच्या उमेदवाराला निवडा-मिथुन

पश्चिम बंगालच्या राज्यातील लोकांना माझं इतकंच सांगणं आहे की बंगालमध्ये ९ टक्के हिंदू असे आहेत जे मतदान करत नाहीत. त्यांनी एकत्र आलं पाहिजे आणि मतदान केलं पाहिजे. त्यांनी बाहेर यावं आणि मतदान करावं. आपण जिंकलो नाही तर हिंदू अडचणीत येतील असं मिथुन चक्रवर्ती यांनी म्हटलं होतं.

# अक्षय खन्ना दाक्षिणात्य सिनेसृष्टीत करणार पदार्पण



लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित ‘छावा’ चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेल्या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. विकी कौशलने साकारलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेचं खूप कौतुक करण्यात आलं. तसंच ‘छावा’ चित्रपटाच्या माध्यमातून अक्षय खन्नाने बॉलीवूडमध्ये जबरदस्त पुनरागमन केलं. या चित्रपटात त्याने औरंगजेबाची भूमिका उत्कृष्टरित्या पेलली. अक्षय खन्नाच्या कामाचं देखील खूप कौतुक करण्यात आलं. आता अक्षय दाक्षिणात्य सिनेसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे. दक्षिणेतल्या एका नव्या चित्रपटात अक्षय खन्ना दमदार भूमिकेत झळकणार असल्याचं समोर आलं आहे.अक्षय खन्ना लवकरच दक्षिणेतील पौराणिक सुपरहिरो चित्रपट ‘महाकाली’ मध्ये दिसणार आहे. काही वृत्तांनुसार, अक्षयला ‘महाकाली’ चित्रपटासाठी अधिकृतपणे साइन करण्यात आलं आहे. तरण आदर्शने इन्स्टाग्रामवर चित्रपटाचे पोस्टर शेअर करून अभिनेत्याच्या कास्टिंगची पुष्टी केली आहे. पण, तो या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारणार की मुख्य अभिनेत्याच्या भूमिकेत दिसणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. जर या चित्रपटात अक्षय खलनायकाची भूमिका करत असेल तर चाहत्यांना त्याला दक्षिणेतील खलनायकाच्या भूमिकेत पाहणं खूप मजेदार असेल.माहितीनुसार, ‘महाकाली’ चित्रपटाचे निर्माते अक्षयच्या भूमिकेवर काम करत आहेत. अक्षयची भूमिका खूपच खास असणार आहे आणि प्रशांत वर्मा सिनेमॅटिक युनिव्हर्स ( PVCU ) मध्ये एक मोठा ट्विस्ट आणणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण अद्याप सुरू झालेले नाही. पण निर्माते त्याची तयारी करण्यात व्यग्र आहेत. दिग्दर्शिका पूजा अपर्णा कोल्लुरू आणि निर्माते प्रशांत वर्मा सध्या कास्टिंग आणि इतर

# जॅकलीन फर्नांडिसच्या आईचं निधन!



बॉलीवूडची लोकप्रिय अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसच्या आईचं निधन झालं आहे. जॅकलीनच्या आई किम या गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर मुंबईतील लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. आईची काळजी घेण्यासाठी जॅकलीनने नियोजित सगळे कार्यक्रम रद्द केले होते. मात्र, रविवारी उपचारादरम्यान किम यांनी अखेरचा श्वास घेतला. जॅकलीन फर्नांडिसची आई किम यांना काही दिवसांपूर्वी हृदयविकाराचा झटका आला होता. यानंतर त्यांना मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मीडिया रिपोर्ट्सनुसार त्यांना २४ मार्च रोजी मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. गेल्या १३ दिवसांपासून त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. जॅकलीन आयपीएलच्या ओपनिंग सेरेमनली परफॉर्म करणार होती. मात्र, अभिनेत्रीला तिच्या आईच्या तब्येतीबद्दल कळताच ती सर्व काही सोडून गुवाहाटीवरून मुंबईत परत आली होती.जॅकलिन फर्नांडिसची आई किम फर्नांडिस यांचं रविवारी उपचारादरम्यान निधन झाल्याची माहिती अभिनेत्रीच्या टीमने ‘हिंदुस्थान टाइम्स’ला दिली आहे. पण, फर्नांडिस कुटुंबीयांकडून अद्याप कोणतंही निवेदन समोर आलेलं नाही. मीडिया रिपोर्ट्नुसार, किम यांना यापूर्वीही हार्ट स्ट्रोकचा ( हृदयविकाराचा झटका ) आला होता. त्यावेळी २०२२ मध्ये त्यांना बहरीनमधील एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.दरम्यान, २६ मार्च रोजी गुवाहाटी येथे होणाऱ्या आयपीएल समारंभात (आयपीएल २०२५) जॅकलीन फर्नांडिस परफॉर्म करणार होती. पण, आईच्या तब्येतीच्या कारणास्तव ती मुंबईत परतली. जेव्हा अभिनेत्रीच्या आईला रुग्णालयात दाखल करण्यात आलं तेव्हा, सलमान खान देखील तिला भेटायला गेला होता.

# अभिषेक बच्चन पापाराझीवर संतापला

बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार यांचं ४ एप्रिलला निधन झालं. वयाच्या ८७व्या वर्षी मुंबईतील कोकिलाबेन धीरूबाई अंबानी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ५ एप्रिलला मनोज कुमार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. जुहू येथील पवनहंस स्मशानात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अभिषेक बच्चनसह अमिताभ बच्चन आणि अरबाज खानसह वडील सलीम खान यांनी उपस्थिती लावली होती. तसंच प्रेम चोप्रा, रजा मुराद, बिंदू दारा सिंह, अनु मलिक, शहबाज खान आणि धीरज कुमार असे अनेक कलाकार मनोज कुमार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पोहोचले होते. यादरम्यान अभिषेक बच्चन एका पापाराझीवर संतापलेला पाहायला मिळाला. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. अभिषेक बच्चनचा हा व्हायरल व्हिडीओ पवनहंस स्मशानातला आहे. व्हिडीओमध्ये एकाबाजूला अमिताभ बच्चन व सलीम खान यांची भेट होताना दिसत आहे. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला अभिषेक बच्चन संतापलेला दिसत आहे. दुःखाच्या प्रसंगात पापाराझींचा सततचा आवाज आणि फोटोंमुळे अभिषेक भडकल्याचं म्हटलं जात आहे. यावेळी अभिषेक रागाच्या भरात फोटो काढणाऱ्या एका पापाराझीला अडवतो आणि त्यानंतर दुसऱ्या पापाराझीला अभिनेता रागाने पाहात सुनावताना दिसत आहे. त्यामुळे तिसरा पापाराझी अभिषेकला शांत करून त्याला पुढे जाण्यासाठी सांगतो. मनोज कुमार यांच्या अंत्यसंस्कारातील अभिषेक बच्चनच्या या व्हिडीओची खूप चर्चा होतं आहे.अभिषेक बच्चनचा व्हायरल व्हिडीओ पाहून अनेकजण त्याचं कौतुक करत आहेत. एका नेटकऱ्याने लिहिलं, “अभिषेकने बरोबर केलं.” दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं की, अभिषेकने योग्य केलं. तो तिथे कुठल्या चित्रपटाच्या प्रमोशनला नव्हता आला. तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, “अभिषेक जया बच्चन यांच्यासारखा वागत आहे.”दरम्यान, ९ ऑक्टोबर १९५६ साली हिरो बनण्याचं स्वप्न उराशी घेऊन वयाच्या १९व्या वर्षी मनोज कुमार यांनी दिल्लीहून मुंबई गाठली. १९५७ मध्ये पहिल्या चित्रपटात १९ वर्षांच्या मनोज कुमार यांनी एका ८०-९० वर्षांच्या भिकारीची छोटीशी भूमिका केली. सुरुवातीला हरिकिशन गोस्वामी असं मनोज यांचं नाव होतं, जे नंतर बदललं गेलं.

# मराठी अभिनेत्रीच्या घरी जमिनीवर बसून जेवला होता रणबीर कपूर

‘परदेस’, ‘हम दिल दे चुके सनम’, ‘मुझसे दोस्ती करोगे’, ‘देवदास’, ‘फिर भी दिल है हिंदुस्तानी’ यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेत्री म्हणून स्मिता जयकर यांना ओळखलं जातं. ऑनस्क्रीन कधी ऐश्वर्या रायची आई, तर कधी रणबीर कपूरची आई अशा अनेक भूमिका स्मिता यांनी साकारल्या आहेत. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्यांनी बॉलीवूड कलाकारांचा अनुभव सांगितला आहे. अभिनेत्री स्मिता जयकर यांनी सध्याचा सुपरस्टार रणबीर कपूरबरोबर ‘अजब प्रेम की गजब कहानी’ या सिनेमात एकत्र काम केलं होतं. हा सिनेमा २००९ मध्ये प्रदर्शित झाला होता. यामध्ये रणबीर आणि कतरिना कैफ प्रमुख भूमिकेत होते.स्मिता जयकर यांनी ‘अजब प्रेम की गजब कहानी’ या सिनेमात रणबीरच्या आईची भूमिका साकारली होती. मात्र, या सिनेमाच्या शूटिंगच्या आधीच रणबीर आणि स्मिता जयकर एकमेकांना भेटले होते. याचा किस्सा अभिनेत्रीने नुकत्याच ‘लोकमत फिल्मी’ला दिलेल्या मुलाखतीत सांगितला आहे.स्मिता



जयकर म्हणाल्या, “रणबीर कपूर माझ्या धाकट्या मुलाला ओळखत होता. तो अगदी साधा आहे. बॉलीवूडचे प्रसिद्ध फॅशन डिझायनर सब्यसाची मुखर्जी, दिग्दर्शक संजय लीला भन्साळी आणि रणबीर कपूर हे तिघं माझ्या घरी आले होते. ते लोक जेवायच्या वेळेला आले होते. संजयला तेव्हा कोलंबीचं कालवण वगैरे खूप आवडायचं. मी या तिघांना कोलंबीचं कालवण वाढलं. रणबीर एवढा साधा आहे की, तो माझ्या घरी जेवायला खाली जमिनीवर बसला होता.”“मला संजयने सब्यसाची मुखर्जीशी ओळख करून दिली… तेव्हा रणबीर खूप लहान होता. तिघेही मस्त जेवले. खरंतर, मला तो रणबीर कपूर आहे हे नंतर समजलं. तेव्हा रणबीर संजय लीला भन्साळींना असिस्ट करत होता. हे सगळे लोक खरंच खूप साधी माणसं आहेत. आपल्याला सिनेमे पाहून किंवा ते बाहेर वावरतात तेव्हा त्यांच्याकडे पाहून कुतूहल वाटतं. कारण, कलाकारांच्या भोवती सगळ्या चाहत्यांची सतत गर्दी असते म्हणून साहजिकच त्यांना तसा ॲटिट्यूड ठेवावा लागतो. पण, प्रत्यक्षात ते फार साधे आहेत.” असं स्मिता जयकर यांनी सांगितलं.‘परदेस’, ‘हम दिल दे चुके सनम’, ‘मुझसे दोस्ती करोगे’, ‘देवदास’, ‘फिर भी दिल है हिंदुस्तानी’ यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेत्री म्हणून स्मिता जयकर यांना ओळखलं जातं.

# गुजरातचा 7 विकेट्सनी दिमाखदार विजय!

## चेंडूवर लाळेच्या परवानगीचा फायदा होतो आहे : सिराज

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**खणखणीत सांघिक प्रदर्शनाच्या बळावर गुजरात टायटन्स संघाने सनरायझर्स हैदराबाद संघावर ७ विकेट्सनी विजय मिळवला. हैदराबादचा यंदाच्या हंगामातला हा चौथा सलग पराभव आहे. गुजरातने खेळपट्टीचा नूर ओळखून गोलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्याच षटकात मोहम्मद सिराजने ट्रॅव्हिस हेडला बाद केलं. त्याने ८ धावा केल्या. फटकेबाजीला सुरुवात केलेल्या अभिषेक शर्माला सिराजनेच तंबूचा रस्ता दाखवला**

त्याने १८ धावा केल्या. पाठोपाठ इशान किशनही बाद झाला. प्रसिध कृष्णाने त्याला स्थिरावू दिलं नाही. ५०/३ वरून हेनरिच क्लासन आणि नितीश रेड्डी यांनी ५० धावांची भागीदारी केली. साई किशोरने क्लासनला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. त्याने २७ धावा केल्या. पुढच्याच षटकात नितीश रेड्डीला माघारी धाडत हैदराबादला अडचणीत आणलं. त्याने ३१ धावा केल्या. उर्वरित षटकांमध्ये अनिकेत वर्मा (१४ चेंडूत १८) आणि कर्णधार पॅट कमिन्स (नाबाद २२) यांनी उपयुक्त खेळी करत हैदराबादला सन्मानजक धावसंख्या गाठून दिली. सिराजने १७ धावांत ४ विकेट्स घेतल्या. प्रसिध कृष्णा आणि साईकिशोर यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या.छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना साई सुदर्शन मोहम्मद शमीची शिकार ठरला. पॅट कमिन्सने जोस बटलरला बाद केलं. यामुळे गुजरातची अवस्था १६/२ अशी झाली. मात्र यानंतर शुबमन गिल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ९० धावांची भागीदारी केली. या भागीदारीने गुजरातच्या विजयाचा पाया रचला. गुजरातसाठी पदार्पणात वॉशिंग्टनने ४९ धावांची सुरेख खेळी साकारली. शमीच्या गोलंदाजीवर अनिकेत वर्माने सुरेख झेल टिपत त्याची खेळी संपुष्टात आणली. कर्णधार शुबमनने सूत्रधाराची भूमिका निभावत संयमी अर्धशतकी खेळी साकारली. वॉशिंग्टन बाद झाल्यानंतर शेरफन रुदरफोर्डने



वेगवान पवित्रा स्वीकारला. त्याने अभिषेक शर्माच्या एका षटकात १८ धावा वसूल केल्या. गिलने ४३ चेंडूत ६१ धावांची खेळी केली. रुदरफोर्डने १६ चेंडूत ३५ धावांची खेळी केली.'चेंडूवर लाळेच्या वापराला परवानगी मिळाल्याचा मला निश्चितच फायदा होतो आहे', असं गुजरात टायटन्सचा गोलंदाज मोहम्मद सिराजने सांगितलं. सिराजने रविवारी हैदराबादविरुद्धच्या लढतीत ४ विकेट्स पटकावल्या. यामुळे गुजरातने हैदराबादला १५२ धावांतच रोखलं. हैदराबादच्या एकापेक्षा एक स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध फलंदाजांना रोखण्यात सिराजची भूमिका निर्णायक ठरली. 'मी गोलंदाजीचा आनंद लुटतो आहे. मला पुरेशी विश्रांती मिळाली. या काळात मी गोलंदाजीवर आणि फिटनेसवर काम केलं. शरीर ताजंतवानं आहे. लाळेच्या वापरास परवानगी मिळाली आहे. याचा फायदा मला मिळतो आहे. चेंडू टप्पा पडल्यानंतर स्विंग होऊ लागला तर विकेट मिळते. लाळेच्या वापरायची परवानगी नव्हती तेव्हा चेंडू बॅटवर सहजतेने येत असे. फलंदाज त्या चेंडूवर जोरदार प्रहार करून धावा वसूल करत. नियम बदलल्यामुळे गोलंदाजांना विकेट पटकावण्याच्या संधी वाढल्या आहेत. या सामन्यातली खेळपट्टी संथ आणि धीमी आहे. मी चेंडू स्विंग करण्याचा प्रयत्न केला पण तो झाला नाही. स्टंप्सच्या दिशेने आक्रमण करणं फायदेशीर ठरतं', असं सिराजने सांगितलं.आयपीएल गव्हर्निंग काऊंसिलने यंदाच्या हंगामात लाळेचा वापर करण्यास परवानगी दिली होती. कोरोना काळात संसर्गाचा धोका लक्षात घेऊन चेंडूवर लाळेच्या वापरास बंदी घालण्यात आली होती. आयपीएलमध्ये ही सूट देण्यात आली असली तरी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आयसीसीने हा नियम अद्यापही शिथिल केलेला नाही. 'आयपीएल'च्या हंगामास सुरुवात होण्यापूर्वी दहाही संघांच्या कर्णधारांची मुंबई येथे बैठक झाली.

### मी गोलंदाजीचा आनंद लुटतो

या बैठकीत कर्णधारांनी 'बीसीसीआय'च्या प्रस्तावास मान्यता दिली.ट्वेन्टी२० प्रकारात फलंदाजांचा दबदबा दिसून येतो. परिस्थिती अनुकूल असेल तरच गोलंदाजांना फायदा होतो. मात्र चेंडूवर लाळेचा प्रयोगास अनुमती मिळाल्याने गोलंदाज आव्हान देऊ शकतात. लाळेचा वापर केल्या सर्वाधिक फायदा हा वेगवान गोलंदाजांनाच होत असतो. यामुळे चेंडू चांगला स्विंग होण्यास मदत मिळते. आपण अनेक गोलंदाज व क्षेत्ररक्षक चेंडू घासताना किंवा लाळेचा वापर करताना पाहिले असेल. हे सर्वजण चेंडूची लकाकी एका बाजूला कायम राखण्यासाठी प्रयत्न करीत असतात. जेणेकरून चेंडू स्विंग होण्यास सुकर होईल. 'आयपीएल'च्या गेल्या हंगामात चेंडूवर लाळेचा वापर करण्याबाबत कठोर नियम होता. कोणताही खेळाडू चेंडूवर तीनदा लाळेचा वापर करताना दिसला, तर सामन्याच्या मानधनाची २५ टक्के रक्कम दंड म्हणून आकारण्यात येत होती.

# सामना सुरू असताना झोपला होता आर्चर!

## मग पहिल्याच षटकात दोन फलंदाजांना केलं क्लीन बोल्ड

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**राजस्थान रॉयल्सचा गोलंदाज जोफ्रा आर्चरने आपल्या वेगाच्या जोरावर वादळी कामगिरी करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आयपीएल २०२५ मधील पहिल्याच सामन्यात ७५ धावा दिल्यानंतर आर्चरने दणक्यात पुनरागमन करत राजस्थानच्या विजयाचा हिरो ठरत आहे. अगदी झोपेतून उठून आर्चरने पहिल्याच षटकात दोन मोठे विकेट घेत सामना राजस्थानच्या बाजूने वळवला. होय, राजस्थानची फलंदाजी सुरू असताना आर्चर झोपला होता.**



पंजाब किंग्ज विरुद्धच्या सामन्यादरम्यान जेव्हा राजस्थान संघाची फलंदाजी सुरू होती. तेव्हा आर्चर मात्र ड्रेसिंग रूममध्ये चादर घेऊन साखर झोपेत होता. आरामात झोपलेल्या आर्चरने गोलंदाजी करण्यासाठी बाहेर येताच पहिल्याच चेंडूवर थेट त्रिफळा उडवला. आर्चर झोपलेला असतानाचा व्हीडिओ आणि फोटो चांगलाच व्हायरल होत आहे. पंजाब किंग्ज विरुद्ध मुल्लानपूर येथे झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २०५ धावा केल्या. एकीकडे राजस्थानचे फलंदाज संघाला २०० धावांच्या पुढे नेण्यासाठी मोठे फटके मारण्यात व्यस्त होते. तिथे आर्चर ड्रेसिंग रूममध्ये निवांत झोपलेला दिसला. सामन्यादरम्यान झोपलेला आर्चर कॅमेऱ्यात कैद झाला आणि काही वेळातच तो सोशल मीडियावर व्हायरल झाला. झोपून उठल्यानंतर आर्चरने पहिल्याच षटकात आपली छाप पाडली. आर्चरला फलंदाजीची संधी मिळाली नाही पण गोलंदाजीला येताच त्याने पहिल्याच चेंडूवर कहर केला. पंजाबच्या डावातील पहिले षटक टाकण्यासाठी आलेल्या या सुपरफास्ट वेगवान गोलंदाजाने पहिल्याच चेंडूवर पंजाबचा सलामीवीर प्रियांश आर्यचा त्रिफळा उडवला. आर्चरच्या चेंडूवर बचाव करताना प्रियांश आर्य क्लीन बोल्ड झाला.जोफ्रा इथेच थांबला नाही आणि त्याच्या पाठोपाठ आलेल्या पंजाबच्या कर्णधाराला त्याच षटकात त्याने माघारी धाडालं. श्रेयस क्रीझवर येताच त्याने पहिल्याच चेंडूवर आक्रमक फलंदाजी करत शानदार चौकार मारला. यानंतर अय्यरने आणखी एक चौकार मारला पण षटकाच्या शेवटच्या चेंडूवर आर्चरने पुन्हा आपली जादू दाखवत अय्यरला क्लीन बोल्ड केलं आणि पहिल्याच षटकातच पंजाबला दोन मोठे धक्के दिले. आर्चरच्या या कामगिरीने पंजाबला बॅकफूटवर ढकलले.

### आर्चर झोपलेला फोटो व्हायरल

तेव्हा आर्चर मात्र ड्रेसिंग रूममध्ये चादर घेऊन साखर झोपेत होता. आरामात झोपलेल्या आर्चरने गोलंदाजी करण्यासाठी बाहेर येताच पहिल्याच चेंडूवर थेट त्रिफळा उडवला. आर्चर झोपलेला असतानाचा व्हीडिओ आणि फोटो चांगलाच व्हायरल होत आहे.राजस्थान रॉयल्सने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २०५ धावा केल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। सोमवार ।
। दि. 7 एप्रिल 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर संस्कार-वर्ग सुरू

# आजी आजोबांच्या लाडात रमली मुले!

### विधायक उपक्रम: डीसके कुंजबन सोसायटीतील ज्येष्ठ महिलांनी एकत्र येत सुरू केले संस्कार वर्ग

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विभक्त कुटुंब पद्धती, कामानिमित्त शहरातील वास्तव्य, शहर-खेड्यातील जीवनशैलीतील अंतर यामुळे अनेक मुलांना आज्जी-आजोबाचे प्रेम व संस्काराची शिकवण लाभत नाहीत. हाच धागा पकडत डीसके कुजंबन सोसायटीमधील जेष्ठ महिला मंडळाने गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर सोसायटीमधील मंदिरात विनामुल्य संस्कार-वर्ग सुरू केले. सोसायटीतील मुलांना एकत्र करत त्यांच्याशी गप्पा मारल्या, संस्कारक्षम गोष्टी शिकवल्या.**



मुले देखील या आजी आजोबांच्या लाडामध्ये रमून गेली आहेत. आजच्या महागाईच्या आणि स्पर्धात्मक युगामधे दैनंदिन जीवन जगण्यासाठी खेड्याखेड्यामधुन अनेकजण मुबंई-पुणे सारख्या शहरात येतात. आय.टी., ॲटोमोबाईल सारख्या क्षेत्रात काम करून अथवा कोणतातरी व्यवसाय करून कुटुंबाच्या पालनपोषणासाठी अथक प्रयत्न करतात.

आईवडील अर्थाजनासाठी सकाळी बाहेर पडतात व संध्याकाळी घरी येतात. दोघांनाही मुलांवर लक्ष द्यायला व संस्कार घडवायला वेळ नसतो. हीच बाब हेरून डीसके कुजंबन सोसायटीमधील जेष्ठ महिला मंडळातील वैजयंती पवार, अनुपमा वाळवेकर, सुलभा गायकवाड, शुभदा जोगळेकर, वर्षा पाटणकर, रोहिणी सबाणे, अलका कदम, उज्वला जोशी, उज्वला नलावडे, सुवर्णा महाडिक, वंदना बाविस्कर, लता बाविस्कर आणि नेहा शिरसाट यांनी संस्कार वर्ग सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सोसायटीमध्ये २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, होळी, गणेशोत्सव, नवरात्री, आषाढी एकादशी, पर्यावरण दिन, महिला दिन असे अनेक कार्यक्रम होतात. सर्व कार्यक्रमांमध्ये आज्जी व नातवंडांचा सहभाग अग्रणीय असतो. रामनवमीचा उत्सव आज्जी-नातवंडांनी इतर सोसायटीतील सभासदांसमवेत आनंदात साजरा केला. मुलांनी राम, सीता, लक्ष्मण व हनुमानाची वेशभुषा धारण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. ह्या उपक्रमासाठी सोसायटी समितीचे सहकार्य लाभले तसेच सोसायटी समितीने आज्जी-आजोबांना विरंगुळा म्हणुन रामनवमीच्या मुहुर्तावर सोसायटीमध्ये वाचनालयाची सुरूवात केली.

> “ खरंतरं आपल्या हिंदुधर्मामध्ये ‘वसुधैव कुटुम्बकम्’ म्हटले आहेच पण ते प्रत्यक्षात आचरणात कसे आणायचे ह्याचा आदर्श डीसके कुंजबन जेष्ठ महिला मंडळाने व सोसायटीमधील बालकांनी ठेवला. डीसके कुंजबन सोसायटीमधील प्रत्येक आज्जीला सर्व मुले ही माझीच नातवंडे आहेत असे वाटते व मुलं पण आज्जीच्या प्रेमाचा आदर राखतात. मुलांचा वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, ज्ञान ग्रहण करण्याची इच्छा, उत्साह, परस्पर सहकार्य हे पाहुन आज्जीवर्गाला हुरूप येतो व जीवनाच्या परतीच्या मार्गावर आपण सत्कार्य करतो ह्याचा परमानंद होतो.

### विस्मरणात गेलेल्या गोष्टींना उजाळा

गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर सोसायटीमधील मंदिरातचं विनामुल्य संस्कार-वर्ग सुरू केले. सोसायटीमधील सर्व मुले ही आपलीच नातवंड आहेत ह्यानात्याने त्यांना रामरक्षा स्तोत्र शिकवणे, छान छान गोष्टी सांगुन मुल्यशिक्षणाचे धडे देणे, दररोज देवासमोर दिवा लावून शुभं करोति म्हणणे असा उपक्रम सुरू केला. नातवंडांना संस्कारवर्गाची गोडी लागावी म्हणुन दररोज वेगवेगळा व पौष्टिक प्रसाद सुद्धा ह्या प्रेमळ आज्ज्या दररोज आणतात.

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch 2024-25

ADMISSION OPEN

## Second Batch

From $5^{th}$ April 2025

Duration One Month

1 Hour /day

Monday to Saturday

For
$10^{th}$ std Students,
$12^{th}$ std students,
parents,
others school students

‘C’ Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

‘C++’ Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

## BBA



**Bachelor of Business Administration**

## BCA



**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com